# देशी झाडांना प्राधान्य द्यावे

अनेक वर्षांपासून आपण निलगिरी, सुबाभूळ, ग्लिरिसिडिया, ऑस्ट्रेलियन आकेशिया आदी परदेशी झाडांनाच प्राधान्य देत आहोत. आपण गुलमोहर, स्पॅथोडिया, टॅबोबिया अशी सुंदर फुलणारी परदेशी झाडे लावतो आणि त्यांच्या देखणेपणाचे कौतुक करतो. पळस, पांगारा, तामण, राईकुडा, नाणा या तितक्याच सुंदर देशी झाडांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. सहज उपलब्धता आणि लगेचच मिळणाऱ्या हिरवाईमुळे परदेशी झाडे लावली जात असली तरी त्यातील धोके लक्षात घेतले जात नाहीत. स्थानिक संवर्धक गटाच्या मार्फत देशी झाडे उपलब्ध करून दिली जातात. नवे झाड लावताना देशी झाडांनाच प्राधान्य द्यायला हवे.

**–केतकी घाटे, मानसी करंदीकर** (पर्यावरण अभ्यासक)

